# महाराष्ट्र विधानसभा

## पहिले अधिवेशन, २०१६

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**डहाणू (जि.पालघर)येथे बिगर आदिवासी व्यक्तीने सरकारी यंत्रणेशी संगनमत करून आदिवासीची जमिन बळकावल्याबाबत**

**(१) ६३० (२२-१२-२०१४). श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्ह्यातील डहाणू येथील मौजे मसोळी स.नं.१८५ ही आदिवासी जमिन बिगर आदिवासी असलेल्या पालाभाई हरिभाई राणा यांनी सरकारी यंत्रणेला हाताशी धरुन जमिन बळकावण्याचा प्रयत्न केल्याचे माहे ऑक्टोबर, २०१४ त्या दरम्यानच्या कालावधीमध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनमार्फत चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीअंती काय निदर्शनास आले व तद्नुसार पालाभाई हरिभाई राणा या बिगर आदिवासी इसमावर व त्याच्याशी संगनमत करणाऱ्या सरकारी यंत्रणेतील संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई करण्यात आली अथवा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, दिरंगाईची कारणे कोणती ?

**श्री. एकनाथराव खडसे (२४-०७-२०१५) :**(१), (२) व (३) पालघर जिल्ह्यातील डहाणू तालुक्यातील मौजे मसोळी येथील स.नं. १८५ या आदिवासी खातेदाराकडील जजिमनी पैकी ०.४९ हे.आर. जमीन श्री.पालाभाई हरिभाऊ राणा यांना शेतीच्या प्रयोजनार्थ विकण्याची परवानगी अप्पर जिल्हाधिकारी जव्हार जि.ठाणे यांनी दि. १७/७/२००० च्या आदेशान्वये दिली होती. सदर खरेदीदार श्री.पालाभाऊ हरिभाऊ राणा यांच्याकडे तालुका दंडाधिकारी डहाणू यांनी दि. ३/५/१९९४ रोजी दिलेल्या अनुसूचित जमातीचा दाखला आहे. सदर दाखल्याची वैधता तपासण्यात आली आहे किंवा कसे याविषयी शहानिशा करण्यास जिल्हाधिकारी, पालघर यांना कळविण्यात आले असून जिल्हाधिकारी यांच्या कडून प्राप्त होणाऱ्या अहवालाच्या आधारे पुढील कार्यवाही करण्याचे संकल्पित आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबईतील दहिसर येथील गणपत पाटील नगर झोपडपटटीमध्ये वीज पुरवठ्याबाबत**

**(२) ३६५६ (२३-१२-२०१४). श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील दहिसर मतदार संघातील गणपत पाटील नगर येथील सुमारे १० ते १५ हजार लोकवस्तीच्या झोपडपट्टीमध्ये रहिवाशी २००० सालाच्या आधीपासून राहत आहेत, अशाच अधिकृत रहिवाशांना वीज पुरवठा देण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वीज उपकेंद्र हे खाजगी मालकीच्या जमिनीवर उभारण्यात येत असून त्यासाठी टाटापावरला रितसर परवानगी दिलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर परिसरातील शेकडो विद्यार्थी वीज पुरवठा नसल्यामुळे स्ट्रीट लाईट (वीजेचे दिव्या) खाली अभ्यास करीत आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर वस्तीमध्ये रहिवाशांना मुलभूत गरजा मिळाव्यात यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधी (दहिसर) यांनी मा.मुख्यमंत्री यांच्याकडे दिनांक २४ नोव्हेंबर, २०१४ रोजी निवेदन देऊन मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर मागणीवर शासनाने कोणता निर्णय घेतला आहे वा घेण्यात येत आहे,

(६) अद्यापपर्यंत निर्णय घेतला नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२३-०७-२०१५) :**(१) हे खरे नाही.

विद्युत नियामक आयोगाच्या अधिनियम २००५ मधील तरतुदीस अनुसरुन निकर्ष पुर्णकरणाऱ्या झोपडपट्टीधारकास वीज जोडणी देण्यात आली/येते.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही.

(४) व (५) सदर निवेदनातील मागण्या नगर विकास विभागाशी संबंधित असल्यामुळे सदर निवेदनावर त्या विभागाने कार्यवाही करावयाची आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कुळ कायदा आदेशानुसार कुळ वहिवाट व शेतजमीन अधिनियमान्वये मिळालेल्या जमीनीचे हस्तांतराबाबत**

**(३) ४४०५ (२२-१२-२०१४). श्री.संग्राम थोपटे (भोर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मा.जिल्हाधिकारी, पुणे, कुळ कायदा शाखा क्र.पीटीए/कावि/३६६/२०१४, दिनांक १५ मार्च, २०१४ च्या परिपत्रकातील आदेशानुसार कुळ वहिवाट व शेतजमीन अधिनियमान्वये मिळालेल्या जमीनीचे हस्तांतराबाबत मा.महसूल मंत्री यांना दिनांक ८ जुलै, २०१४ रोजी निवेदन दिले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबतीत शासनाने कोणती तातडीची कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (०३-०८-२०१५) :**(१) महसूल विभागातील अभिलेख तपासले असता प्रश्नाधीन निवेदन प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही तसेच मुळशी, वेल्हा व भोर या तहसिल कार्यालयासह जिल्हाधिकारी, पुणे यांचे कार्यालयात सदर निवेदन प्राप्त झाले नसल्याचे जिल्हाधिकारी, पुणे यांनी कळविले आहे.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे कासेगाव (ता.वाळवा, जि.सांगली) येथील प्रशन गावातील गावठाण/गायरानाबाबत**

**(४) ४८७४ (१६-०२-२०१५). श्री.शिवाजीराव नाईक (शिराळा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे कासेगाव (ता.वाळवा, जि.सांगली) येथील प्रशन गावातील गावठाण/गायरानामधील गट नं.२२४१ पूर्व अ व ३४८९ चा १ मधील घरे नावावर करण्याबबत तेथील रहिवाशी मागील ५५ वर्षापासून मागणी करित आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यातील ९०% लोक मागासवर्गीय तथा अनुसूचित जमाती, भटक्या जमातीतील आहेत, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, त्याना शासनाकडून विद्युत पुरवठा उपलबध असून संबंधित घरे कालबाह्य होऊनही त्याच्या दुरुस्तीकरिता केवळ संबंधित प्लॉट त्यांच्या नावावर नसल्याने त्यांना दुरुस्तीकरिता अथवा नविन घर बांधण्याकरिता अर्थसहाय्य मिळू शकत नाही, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, येथील नागरिकांना न्याय देण्याच्या दृष्टीने शासनाची भूमिका काय आहे व शासनाने त्या दृष्टीने काय कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे ?

**श्री. एकनाथराव खडसे (०५-०३-२०१६) :**(१), (२), (३) व (४) मौजे कोसेगांव येथील गट नं. २२४१/अ/१ चे एकुण क्षेत्र १ हे. २४ आर व गट नं.३४८९/१ क्षंत्र ० ह. ६९-४४ आर असून सदर गाननं ७/१२ उतारे पाहता कब्जेदार सदरी "सरकार" अशी नोंद असून सदर इतर अधिकारामध्ये "गायरान गावचे गुरास मोफत, भूमीहीन व गृहहीन लोकांना घरे बांधणेकरीता यापैकी २ एकर ८ गुंठे ग्रामपंचायतीचे ताब्यातून काढून सरकारने आपले ताब्यात घेतली" असा शेरा इतर अधिकारामध्ये नमुद केलेला आहे. तसेच गांव कामगार तलाठी कासेगांव यांचेकडील गांव नमुना नं. १ ई (अतिक्रमण नोंदवही) मध्ये सदरची अतिक्रमणे नमुद आहेत. त्यातील ९०% लोक मागासवर्गीय तथा अनुसूचित जमाती, भटक्या जमातीतील आहेत, त्यांना शासनाकडून विद्युत पुरवठा उपलब्ध असून संबंधित घरे कालबाह्य होऊनही त्याच्या दुरुस्तीकरिता केवळ संबंधित प्लॉट त्यांच्या नावावर नसल्याने त्यांना दुरुस्तीकरिता अथवा नविन घर बांधण्याकरिता अर्थसहाय्य मिळू शकत नाही. ही वस्तुस्थिती आहे.

गायरान जमिनीच्या वापराबाबत मा.सर्वोच्च न्यायालयाने “जगपाल सिंग व इतर विरुध्द पंजाब सरकार व इतर” या प्रकरणी दि. २८/१/२०११ रोजी दिलेल्या निर्देशानुषंगाने महसूल व वन विभागाच्या दि. १२/७/२०११ रोजीच्या शासन निर्णयानुसार यापुढे गायरान जमीन कोणत्याही व्यक्ती, खाजगी संस्था, संघटना यांना कोणत्याही प्रयांजनासाठी मंजुर करण्यात येऊ नये असे आदेश आहेत. म्हणून प्रस्तुत प्रकरणी दि.१२/७/२०११ व दि.०४/०४/२००२ च्या शासन निर्णयांच्या तरतुदीनुसार प्रकरण तपासून जिल्हाधिकारी, सांगली यांच्याकडून अहवाल मागविण्यात आलेला आहे.

---

**वाडीव-हे (जि.नाशिक) इगतपुरी या परिसरातील जमिन पूर्वी औद्योगिकीकरण, नॅशनल हायवे, मिलिटरी, धरणी आदींसाठी भू-संपादित न करण्याबाबत.**

**(५) ५५५० (०४-०४-२०१५). श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाडीव-हे (जि.नाशिक) इगतपुरी या परिसरातील जमिनी पूर्वी औद्योगिकीकरण, नॅशनल हायवे, मिलिटरी, धरणी आदींसाठी मोठ्या प्रमाणात संपादित करण्यात आली असल्यामुळे सदरील गावच प्रकल्पग्रस्त झाले असल्याने येथील जमिन भू-संपादित करण्यात येऊ नये अशी येथील नागरिकांनी तसेच लोकप्रतिनिधींनी माहे जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास मा.मुख्यमंत्री यांच्याकडे निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन काय कार्यवाही केली आहे वा करणार आहे,

(३) अद्याप कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (११-०८-२०१५) :**(१) मौजे वाडीव-हे, ता.इगतपुरी, जि.नाशिक येथील जमीन आर्टिलरी रेन्ज एरिया, देवळाली, नाशिक यांच्यामार्फत मिलिटरीने संपादित केली आहे. सदर गाव प्रकल्पग्रस्त झाल्याने तेथील संपादित करण्यात येऊ नये अशी तेथील नागरिकांनी तसेच लोकप्रतिनिधींनी माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यासुमारास मा.मुख्यमंत्री यांच्याकडे मागणी केल्याबाबतचे निवेदन प्राप्त झाल्याचे तपासणी अंती आढळून येत नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**आदिवासींच्या जमिनीचा विकास करारानामा करुन बिगर आदिवासी व्यक्तीस त्या जमिनींची वहिवाट हस्तांतरीत करण्यावरही निर्बंध असल्याबाबत**

**(६) ५९०४ (२२-१२-२०१४). श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आदिवासींच्या जमिनीचा विकास करारानामा करुन बिगर आदिवासी व्यक्तीस त्या जमिनींची वहिवाट हस्तांतरीत करण्यावरही निर्बंध असल्याने विकास करारनामे विधी अग्राहय (गैरकायदेशीर) ठरतात असे दिनांक २६ मार्च, २०१३ रोजीच्या महसूल विभागाच्या शासन परिपत्रक क्र.आदिवासी- २०१३ /प्र.क्र. २६/ल-१ अन्वये तहसिलदार वसई यांना कळविण्यात आले असून त्यानुसार मौजे गोखिवरे (ता.वसई) येथील विकास करारनाम्याद्वारे हस्तांतरणात झालेल्या तरतूदीनुसार कारवाई करावी अशी लेखी विनंती संबंधित आदिवासींनी तहसीलदार वसई यांना कुळ कायदा कलम (४ क/ ०१ /२०१३ या प्रकरणी एप्रिल २०१४ च्या चौथ्या आठवड्यात दिलेल्या लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, त्याबाबत कोणती कारवाई करण्यात आली आहे वा येत आहे ?

**श्री. एकनाथराव खडसे (१७-०८-२०१५) :**(१) अशा आशयाचे निवेदन तहसिलदार वसई यांचेकडे प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील वीज कंपन्यांची स्थिती अत्यंत विदारक असून महाजनको आणि महापारेषण या दोन कंपन्या मोठ्या प्रमाणावर तोट्यात गेल्याने मालमत्तेची विक्री करण्याचा निर्णय घेतल्याबाबत**

**(७) ६००९ (१७-०४-२०१५). श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.सदा सरवणकर (माहिम), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील महाजनको आणि महापारेषण या दोन वीज कंपन्या तोट्यात असल्याने तोटा भरुन काढण्यासाठी दोन्ही कंपन्यांची मालमत्ता विकण्याचा प्रस्ताव राज्य शासनाच्या मंजूरीसाठी दोन्ही वीज कंपन्यांनी पाठविलेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या दोन्ही कंपन्यांना अनुक्रमे किती तोटा झाला आहे व त्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, दोन्ही कंपन्यांनी पाठविलेल्या प्रस्तावास शासनाने मंजूरी दिली आहे काय वा त्यानुषंगाने कार्यवाहीची सद्य:स्थिती काय आहे ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१०-०८-२०१५) :**(१) हे खरे नाही.
(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## जगप्रसिध्द शहर अंजिठाची तालुका निर्मिती करण्याबाबत

**(८) ६१७० (०४-०४-२०१५). श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मा.उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद यांनी क्र.०६/११या जनहित याचिकेवर दिनांक ८ फेब्रुवारी, २०११ रोजी जगप्रसिध्द शहर अंजिठाची तालुका निर्मिती करण्यासाठी आदेश दिले आहेत, हे खरे आहे काय,
(२) या कार्यवाहीसाठी मंत्रिमंडळ उपसमिती, तालुके निर्मिती पुनर्रचना समिती आणि तज्ञसमितीचे अहवाल यापूर्वीच शासनास प्राप्त झाले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्सास, तालुका निर्मितीसाठी तत्कालीन राज्य शासनाचे मंत्री, विरोधी पक्षाचे आमदार, खासदार यांनीही शिफारशी केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, यावर शासनाने कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे ?

**श्री. एकनाथराव खडसे (२८-०७-२०१५) :**(१) हे खरे नाही.
तथापि, औरंगाबाद जिल्हयातील अजिंठा तालुक्याच्या निर्मितीबाबत शासनाकडे प्राप्त झालेल्या निवेदनावर सत्वर निर्णय घ्यावा, असे मा.मुंबई उच्च न्यायालयाच्या, औरंगाबाद खंडपीठाने जनहित याचिका क्र.०६/२०११ च्या संदर्भात दि. ८/२/२०११ रोजी दिलेल्या आदेशात सूचित केले होते.
(२) राज्यातील तालुका पुनर्रचनेबाबत मंत्रिमंडळ उपसमिती किंवा तज्ञ समितीने गठण करण्यात आलेले नाही.
तथापि, तालुका पुनर्रचनेबाबतचे निकष ठरविण्याकरीता गठीत करण्यात आलेल्या समितीचा अहवाल शासनास प्राप्त झाला आहे.
(३) होय.
(४) तालुका पुनर्रचनेबाबतचे निकष ठरविण्याकरीता शासनाकडून गठीत करण्यात आलेल्या समितीचा अहवाल प्राप्त झाला असून सदर अहवालानुसार तालुका पुनर्रचेबाबतचे शासनाचे धोरण निश्चित करण्याचे संकल्पित आहे व त्या आधारेच औरंगाबाद जिल्हयातील अजिंठा तालुक्याच्या निर्मितीबाबतचा यथोचित निर्णय घेण्याचे योजिले आहे.

---

**रत्नागिरी जिल्ह्यातील संगमेश्वर तालुक्यातील देवरुख तहसिल कार्यालयातील शिरस्तेदार यांनी शेतकऱ्यांची केलेली फसवणूक**

**(९) ६१८३ (०४-०४-२०१५). श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी जिल्ह्यातील संगमेश्वर तालुक्यातील देवरुख तहसिल कार्यालयातील शिरस्तेदार पी.जे.सुपेकर यांच्याविरुध्द शेतकऱ्यांची फसवणूक करुन जमीन मुरवणे, चुकीचा नकाशा देणे, परस्पर जमीन विक्री करण्याचा प्रयत्न करणे अशी तकार मानवाधिकार संघटनेचे जिल्हाध्यक्ष बाळकृष्ण बनकर यांनी मा.मंत्री महसूल यांच्याकडे नुकतीच लेखी स्वरुपात पाठविली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, त्यात काय आढळून आले व तद्नुसार संबंधितांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. एकनाथराव खडसे (०२-०९-२०१५) :** (१) उप अधिक्षक, भूमी अभिलेख, संगमेश्वर या कार्यालयातील शिरस्तेदार श्री.पी.जे.सुपेकर यांच्याविरुध्द तक्रार प्राप्त झाली आहे.

(२) व (३) तक्रारदार यांची मुळ तक्रार मौजे देवरुख येथील न.भू.क्र१२६८ या मिळकतीच्या नकाशा व क्षेत्र दुरुस्ती बाबत आहे. सदरची बाब अपिलीय स्वरुपाची असल्याने तक्रारदार यांना उप संचालक, भूमि अभिलेख, कोकण प्रदेश, मुंबई यांच्या कार्यालयाकडील दिनांक ३१.३.२०१५ च्या पत्राने अपील करण्याबाबत कळविण्यात आले आहे.

---

**धामणंद (ता.खेड, जि.रत्नागिरी) या गावात कातकरी समाजाच्या जातीचे व अन्य दाखले वितरीत केल्याबाबत**

**(१०) ६२३० (१०-०४-२०१५). श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धामणंद (ता.खेड, जि.रत्नागिरी) या गावात दिनांक २७ डिसेंबर, २०१४ रोजी उपविभागीय अधिकारी व तहसिलदार, खेड, यांच्यामार्फत कातकरी समाजाच्या जातीचे व अन्य दाखले वितरणाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या कार्यक्रमाची पूर्वकल्पना तहसिल कार्यालयातून कातकरी समाजाच्या ग्रामस्थांना देण्यात आली होती त्यानुसार सर्व समाजबांधव कामधंदा बाजूला ठेऊन एकत्र जमले होते व शासकीय अधिकारी येणार म्हणून यांनी जय्यत तयारी केली होती, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रत्यक्षात शासनाचा एकही अधिकारी व कर्मचारी गावात पोहोचला नाही, त्यामुळे कातकरी बांधव संतप्त झाले होते, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, यांसदर्भात चौकशी करण्यात आली आहे व त्यात काय आढळून आले तसेच तद्नुसार संबंधित अधिकाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ?
(५) नसल्यास, विलबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (२९-०७-२०१५) :**(१) होय.
(२) मंडळ अधिकारी, धामणंद यांचेमार्फत कार्यक्रमाची पूर्व कल्पना देण्यात आली होती.
(३), (४) व (५) दाखले वाटप करण्यासाठी दि.२०.१२.२०१४ पूर्वी अर्ज सादर करण्याचे आदिवासी आदिम कातकारी संघटना व काही कातकरी बांधव यांच्या संयुक्त बैठकीत ठरले होते व दि.२७.१२.२०१४ रोजी दाखले वाटप करण्याचे ठरले होते. तथापि, सदर अर्ज दि.२६.१२.२०१४ रोजी प्राप्त झाले. प्राप्त अर्जात त्रुटी असल्याने दाखले एका दिवसात तयार करुन देणे शक्य नव्हते. त्यामुळे तसे दि.२६.१२.२०१४ रोजी मंडळ अधिकाऱ्यांमार्फत आदिवासी आदिम कातकरी संघटना व संबंधित व्यक्तींना कळविण्यात आले होते.

---

## नवी मुंबई क्षेत्रात स्वतंत्र तहसिलदार कार्यालय स्थापन करणेबाबत

**(११) ६९१३ (०४-०४-२०१५). श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नवी मुंबई शहराच्या निर्मितीस २५ वर्षापेक्षा अधिक कालावधी होऊनही तसेच शहराची लोकसंख्या १५ लाखाच्या आसपास असतांनाही शहरात स्वतंत्र तहसिलदार कार्यालय अस्तित्वात नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नवी मुंबई शहरासाठी स्वतंत्र तहसिल कार्यालय स्थापन करण्यात यावे म्हणून स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे नोव्हेंबर, २०१४ मध्ये मा.महसूल मंत्री महोदय यांनी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने तसेच नवी मुंबईतील नागरिकांची होत असलेली गैरसोय विचारात घेऊन नवी मुंबई परिसरात स्वतंत्र तहसिलदार कार्यालय स्थापन करण्याबाबत शासनस्तरावरुन काय कार्यवाही करण्यात आली आहे वा करण्यात येत आहे ?

**श्री. एकनाथराव खडसे (२८-०७-२०१५) :**(१) होय.
(२) व (३) सदर निवेदन प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही.

तथापि, तालुका पुनर्रचनेबाबतचे निकष ठरविण्याकरीता गठीत करण्यात आलेल्या समितीचा अहवाल प्राप्त झाला असून सदर अहवालानुसार तालुका पुनर्रचनेबाबतचे शासनाचे धोरण निश्चित करण्याचे संकल्पित आहे व त्या आधारे नवी मुंबई क्षेत्रात स्वतंत्र तहसिलदार कार्यालय स्थापन करणेबाबतचा यथोचित निर्णय घेण्याचे योजिले आहे.

---

**मालेगांव हा नविन जिल्हा निर्माण करण्याबाबतची मागणी**

**(१२) ७५१५ (०४-०४-२०१५). श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालेगांव हा नविन जिल्हा निर्माण करण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मागील अनेक वर्षापासून मागणी करीत असून या संदर्भात त्यांनी आंदोलनेही केली असल्याचे माहे जानेवारी, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासन आवश्यक ती कार्यवाही करणार आहे काय वा करण्यात येत आहे

(३) नसल्यास, यामागील विलंबाची सर्वसाधरण कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (२८-०७-२०१५) :**(१) होय.

(२) व (३) जिल्हा विभाजनाचे निकष ठरविण्याकरीता गठीत करण्यात आलेल्या समितीचा अहवाल अद्याप अप्राप्त असून सदर अहवाल प्राप्त झाल्यानंतर जिल्हा विभाजनाबात शासनाचे धोरण निश्चित करण्याचे संकल्पित आहे व त्या आधारेच नवीन मालेगाव जिल्हा निर्मितीबाबत यथोचित निर्णय घेण्याचे योजिले आहे.

---

**रोहा (जि.रायगड) तालुक्यातील बेदखल आदीवासी कुळाच्या पिकपहाणी नोंदी झाल्या नसल्याबाबत**

**(१३) ७६५३ (०४-०४-२०१५). श्री.धैर्यशील पाटील (पेण), श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रोहा (जि.रायगड) तालुकयातील बेदखल आदीवासी कुळाच्या पिकपहाणी नोंदी करण्याबाबत दिलेल्या अर्जावर नायब तहसिलदार यांनी सदर नोंदी न करण्याबाबत शासनाचे आदेश आहेत व अशा केसेस मध्ये पीकपहाणी नोंदी करता येणार नाही असे आदेश आहेत हे ,खरे आहे काय

(२) असल्यास, सदर आदेश कोणत्या तारखेस व कोणत्या स्तरावरुन निर्गमित करण्यात आले आहेत,

(३) नसल्यास, बेदखल आदिवाशी कुंळाच्या पिकपहाणी नोंदी न करण्याची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (१७-०८-२०१५) :** (१), (२) हे खरे नाही.

(३) सदर प्रकरणी पीक पाहणी सदरी नोंद घेण्याबाबत संबंधित आदिवासी तसेच इतरांनी आवश्यक ती कागदपत्रे व पुरावे सादर केले नसल्यामुळे पिक पाहणी सदरी नोंदी घेण्याबाबतचे अर्ज तहसिलदार, रोहा यांचे स्तरावर निकाली काढण्यात आले आहेत.

---

**मुंबईतील झोपडया शासन अधिकृत करते त्याप्रमाणे समुद्र किनाऱ्यालगतच्या मच्छिमारांच्या जागा मच्छिमार समाजाच्या नावे करण्याबाबत**

**(१४) ८१८२ (०४-०४-२०१५). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.राज पुरोहित (कुलाबा), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.विलास तरे (बोईसर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील झोपडया शासन अधिकृत करते त्याप्रमाणे समुद्र किनाऱ्यालगतच्या मच्छिमारांच्या जागा मच्छिमार समाजाच्या नावे कराव्यात अशी मागणी रायगड जिल्हा कोळी समाज संघाने मा.मुखमंत्री यांच्याकडे मागणी केली असल्याचे माहे जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मच्छिमार गेल्या अनेक वर्षापासून पिढया न पिढया समुद्र किनारी वस्ती करुन कुटुंबाच्या उदरनिर्वाह करीत आहे अनेक पिढया समुद्रकिनारी राहून देखील, मच्छिमार राहत असलेली घरे, व मच्छी व्यवसायाच्या जागा मच्छिमाराच्या नावे झाले नसल्याने मच्छिमारांना वास्तव्याचे ठिकाण नसल्यामुळे त्यांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मच्छिमारांना कायदेशीर वास्तव्याचे ठिकाण मिळण्यासाठी शासन आवश्यक ती कार्यवाही करणार आहे वा करीत आहे,

(४) नसल्यास, यामागील विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (०४-०९-२०१५) :**

(१) व (२) रायगड जिल्हा कोळी समाज संघ, यांच्या दिनांक २९.१२.२०१४ रोजीच्या निवेदनात नमूद मागणी अनुषंगाने, सदर निवेदन पुढील आवश्यक त्या कार्यवाहीसाठी विभागीय आयुक्त, कोकण विभाग, यांच्याकडे दिनांक ०९.०७.२०१५ रोजीच्या पत्रान्वये पाठविण्यात आले आहे.

रायगड जिल्ह्यातील समुद्र किनारपट्टीवरील मच्छिमारांची घरे"गावठाण" मध्ये आहेत. मच्छिमारांची घरांच्या जमिनीचा ७/१२ उतारा नावे करण्याचे शिल्लक नाही.

तसेच रायगड जिल्ह्यातील मच्छिमारांना मच्छि व जाळी सुकविण्यासाठी दिलेल्या जमिनीच्या ७/१२ सदरी इतर हक्कात नोंदी घेण्यात आलेल्या आहेत असे विभागीय आयुक्त, कोकण यांनी कळविले आहे.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मौजा नागभिड (ता.नागभिड, जि.चंद्रपूर) येथे जिल्ह्याचा दर्जा व मौजा भिसी ता. चिमूर व मौजा तळोधी बाळापूर ता.नागभिड येथे नविन तालूके मंजूर करण्याबाबत**

**(१५) ८६५८ (०४-०४-२०१५). श्री.सुरेश धानोरकर (वरोरा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजा नागभिड (ता.नागभिड, जि.चंद्रपूर) येथे जिल्ह्याचा दर्जा व मौजा भिसी ता.चिमूर व मौजा तळोधी बाळापूर ता.नागभिड येथे नविन तालुके मंजूर करण्याबाबत स्थानिक

लोकप्रतिनिधींनी दिनांक १८ जानेवारी, २०१५ रोजीच्या सुमारास मा.महसूल मंत्री, महाराष्ट्र राज्य यांना एक लेखी निवेदन दिले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निवेदनानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (२८-०७-२०१५)** :(१) सदर निवेदन प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही.

(२) व (३) (अ) जिल्हा विभाजनाचे निकष ठरविण्याकरीत गठीत करण्यात आलेल्या समितीचा अहवाल अद्याप अप्राप्त असून सदर अहवाल प्राप्त झाल्यानंतर जिल्हा विभाजनाबाबत शासनाचे धोरण निश्चित करण्याचे संकल्पित आहे व त्या आधारेच नवीन जिल्हा निर्मितीबात यथोचित निर्णय घेण्याचे योजिले आहे.

(ब) तसेच, तालुका पुनर्रचनेबाबतचे निकष ठरविण्याकरीता गठीत करण्यात आलेल्या समितीचा अहवाल प्राप्त झाला असून सदर अहवालानुसार तालुका पुनर्रचनेबाबतचे शासनाचे धोरण निश्चित करण्याचे संकल्पित आहे व त्या आधारेच नवीन तालुका निर्माण करणेबाबतचा यथोचित निर्णय घेण्याचे योजिले आहे.

---

### अमरावती जिल्ह्यातील जिल्हा परिषद व खाजगी माध्यमिक शाळांना कोणत्याही प्रकारचे उत्पन्न नसतांना या शाळांची वीज बिले व्यासायिक दराने आकारली असल्याबाबत.

**(१६) ९२९५ (०७-०४-२०१५). प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्ह्यातील जिल्हा परिषद व खाजगी माध्यमिक शाळांना कोणत्याही प्रकारचे उत्पन्न नसतांना या शाळांची वीज बिले व्यावसायिक दराने आकारली जात असल्याचे माहे नोव्हेंबर, २०१४ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शाळास्तरावर वीज बिले भरण्याची तरतूद नसल्यामुळे अमरावती जिल्ह्यातील शाळेतील मुख्याध्यापक आर्थिक विवंचनेत सापडल्यामुळे जिल्ह्यातील १२०० शाळांची वीज बिले दोन महिन्यापासून थकित आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रश्न भाग १ व २ बाबत चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, या चौकशी नुसार कोणती कारवाई करण्यात आली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास त्यामागील विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१०-०८-२०१५)** :(१) हे अंशत: खरे आहे. माहे नोव्हेंबर,२०१४ मध्ये अमरावती जिल्ह्यातील एकूण ६६१ शाळांपैकी, १७ शाळांना व्यावसायिक दराने वीज आकारणी होत होती. त्याचे वीज दर संकेत बदलवून सार्वजनिक सेवा वर्गवारीनुसार, वीज देयकाची आकारणी करण्यात आली.

(२) हे अंशत: खरे आहे. सद्य:स्थितीत अमरावती जिल्ह्यातील एकूण ६६१ शाळांपैकी, ४६८ शाळांकडे १०.४८ लक्ष रुपयांची थकबाकी आहे.

(३) होय.
(४) अमरावती जिल्ह्यातील शाळांची यादी काढून चौकशीअंती, वीज जोडणी वैयक्तीक नावाने असलेल्या एकूण १७ शाळांना, व्यावसायिक दरांने विजेची आकारणी करण्यात येत असल्याचे आढळले. या सर्व १७ शाळांना वीज दर संकेतामध्ये बदल करण्यात येऊन, सदर शाळांना सार्वजनिक सेवा या वर्गवारीनुसार वीज देयकाची आकारणी करण्यात आली आहे. तसेच, सदर संस्थांच्या वीज देयकाची दुरुस्ती करुन, देण्यात आली आहे व त्यांना थकबाकीची रक्कम लवकर भरण्याची विनंती करण्यात आलेली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वसई तालुका कृषी उत्पन्न बाजार समितीने वसई तालुक्यातील मौजे जुचंद्र येथील शासकीय जमीन मार्केट यार्ड साठी राखीव असणारी जमीन मिळण्याबाबत**

**(१७) ९४५४ (०४-०४-२०१५). श्री.विलास तरे (बोईसर), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई तालुका कृषी उत्पन्न बाजार समितीने वसई तालुक्यातील मौजे जुचंद्र येथील स.नं.९१,१२४, १२५, १२९ ही शासकीय जमीन मार्केट यार्ड साठी राखीव असणारी जमीन मिळण्याची मागणी सभापती, कृषी उत्पन्न बाजार समिती यांनी दिनांक २१ /०९/२०११ रोजीच्या निवेदनाद्वारे मा.महसूलमंत्री यांच्याकडे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांनी दिनांक २१/०९/२०११ रोजीच्या पत्रान्वये प्रधान सचिव, महसूल यांचेकडे योग्य त्या कागदपत्रांची पूर्तता करुन घेवून मंजूरीसाठी प्रस्ताव पाठविला आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, प्रस्तावाची सद्य:स्थिती काय आहे,
(४) कृषी उत्पन्न बाजार समितीस जमीन अद्यापपर्यंत न देण्यामागे कोणती कारणे आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (२८-०७-२०१५) :**(१), (२), (३) व (४) सभापती वसई कृषी उत्पन्न बाजार समिती यांनी दि. १९/११/२०१० रोजीच्या निवेदनान्वये कृषी उत्पन्न बाजार समितीस जमीन मिळणेबाबत मागणी केली असून त्याअनुषंगाने विभागीय आयुक्त कोकण यांनी दि. २१/९/२०११ रोजीच्या पत्रान्वये प्रश्नाधिन जमीन वसई तालुका कृषी उत्पन्न बाजार समितीस देणेबाबतचा प्रस्ताव सादर केलेला होता. परंतू दि. २१/६/२०१२ रोजी मंत्रालयास लागलेल्या आगीमध्ये सदर प्रकरणाची नस्ती जळून नष्ट झाल्याने विभागीय आयुक्त कोकण यांनी पुर्नबांधणी करुन प्रस्ताव सादर केलेला आहे. अंतिम निर्णय घेण्याच्या दृष्टीने सदर प्रस्तावावर कार्यवाही सुरु आहे.

---

**नागपूर येथील खिंडसी जलसंग्रह क्षेत्रमधील भूखंड परवानगी न घेता त्याचा वापर करीत असल्याबाबत**

**(१८) ९५३६ (०७-०४-२०१५). श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथील खिंडसी जलसंग्रह क्षेत्रमधील भूखंड परवानगी न घेता त्याचा वापर करीत असल्याचे माहे डिसेंबर, २०१४ च्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरच्या भूखंडाचा वापर हे संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांत अर्थपूर्ण व्यवहार करुन करीत आहेत हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याप्रकरणी चौकशी केली आहे काय त्यात काय आढळून आले,
(४) चौकशीनुसार संबंधित अधिकारी व भूखंड वापर असलेल्या व्यक्तीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. एकनाथराव खडसे (२७-०७-२०१५) :**(१) (२) (३) व (४) नागपूर येथील खिंडशी जलसंग्रह क्षेत्रामधील भूखंडाची परवानगी न घेता वापर करण्यात येत असल्याचे माहे ऑक्टोंबर,२०१४ च्या सुमारास निदर्शनास आले आहे.

सदर अतिक्रमणधारकांना जिल्हाधिकारी, नागपूर यांनी नोटीस दिली असून, त्यांच्याविरुध्द दंडात्मक कारवाई करण्यात येत आहे.

---

**कन्नड तालुक्याचे विभाजन करून नवीन पिशोर तालुक्याच्या निर्मिती करण्याबाबत**

**(१९) ९५७४ (०४-०४-२०१५). श्री.हर्षवर्धन जाधव (कन्नड) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कन्नड तालुक्याचे विभाजन करून नवीन पिशोर तालुक्याच्या निर्मितीबाबत विभागीय आयुक्त औरंगाबाद यांचेकडून राज्य शासनास दिनांक १३ ऑगस्ट, २०१२ रोजी प्रस्ताव दाखल करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर तालुका निर्मितीच्या प्रस्तावाबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (२८-०७-२०१५) :**(१) होय.
(२) व (३) तालुका पुनर्रचनेबाबतचे निकष ठरविण्याकरीता गठीत करण्यात आलेल्या समितीचा अहवाल प्राप्त झाला असून सदर अहवालानुसार तालुका पुनर्रचनेबाबतचे शासनाचे धोरण निश्चित करण्याचे संकल्पित आहे व त्या आधारेच औरंगाबाद जिल्ह्यातील कन्नड तालुक्याचे विभाजने करुन नवीन पिशोर तालुक्याची निर्मिती करणेबाबतचा यथोचित निर्णय घेण्याचे योजिले आहे.

---

**पवन ऊर्जा प्रकल्पाच्या कामावर ठेवलेल्या वॉचमनना कामगार मंडळाने ठरवून दिलेला पगार देणेबाबत**

**(२०) १०१९२ (०७-०४-२०१५). श्री.शंभूराज देसाई (पाटण) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सर्वत्र मोठया प्रमाणात पवनऊर्जा आपआपले प्रकल्प उभारले असून या प्रकल्पावर देखरेख करण्याकरीता वॉचननांच्या नियुक्ती केल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विविध पवनऊर्जा प्रकल्प कंपन्यांनी देखरेख करण्याकरीता नेमलेले वॉचमन यांची नोंद सहाय्यक कामगार आयुक्त यांच्या कार्यालयाकडे न करता खाजगी स्वरुपात मजूरीवर वॉचमन भरलेले असून या वॉचमनना कामगार मंडळाने ठरवून दिलेला ७५००/- रूपये पगार या कंपन्या न देता २०००/- ते २५००/- रुपये पगार देवून वॉचमनची फसवणूक करीत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पवनऊर्जा कंपन्यांनी उभारलेल्या पवनचक्क्यांची व त्याच्या देखरेखी करीता ठेवलेल्या वॉचमनांची नोंद सहाय्यक कामगार आयुक्त यांच्या कार्यालयाकडे करणे गरजेचे असताना ती केली नसून वॉचमनवर दबाव टाकून त्यांना केवळ राबवून घेण्याचे काम या कंपन्या करीता आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, राज्य शासनाने यासंबंधी चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०१-०९-२०१५) :** (१) हे खरे आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

(३) हे अंशत: खरे आहे.

(४) व (५) महाराष्ट्र खाजगी सुरक्षारक्षक (नोकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम, १९८१ अंतर्गत अंमलबजावणी दि.२७.२.२००९ पासून एकूण १५ जिल्हा क्षेत्रांसाठी लागू करण्याबाबत निदेश कामगार विभागामार्फत देण्यात आल्याची अधिसूचना जारी करण्यात आली आहे. तसेच, अंतिम अधिसूचना क्र.सिजीओ/१५०८/प्र.क्र.१२३६/काम-५, दिनांक २१.२.२०१२ रोजी जारी करण्यात आली आहे. त्यान्वये जिल्हा स्तरावर जिल्हा सुरक्षा मंडळ सुरु करुन त्याअंतर्गत शासकीय-निमशासकीय आस्थापनांना उक्त अधिनियमाच्या तरतूदीचे अनुपालन करण्याबाबत कळविण्यात आलेले आहे. कामगार निरीक्षकांनी निरीक्षणे केली असून, पुणे विभागात दोन आस्थापनांविरुध्द फौजदारी खटले दाखल केलेले आहेत. तसेच संबंधित कामगारांना आर्थिक लाभ मिळवून दिला आहे. उर्वरीत आस्थापनां मालकांविरुध्द कायदेशीर कारवाई सुरु आहे.

**रायगड जिल्ह्यातील ग्रामपंचायत तुरुबांडी हद्दीतील मौजे तुरुबांडी येथे जमिनीवर शिपींग यार्ड उभारण्याबाबत**

**(२१) १०६२० (१७-०४-२०१५). श्री.भरतशेठ गोगावले (महाड) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्ह्यातील ग्रामपंचायत तुरुबांडी हद्दीतील मौजे तुरुबांडी गावांतील रजिस्टर नं २१,२४,६४ या क्षेत्रामधील जमिनीवर शिपींग यार्ड उभारण्याकरिता सन २००९ मध्ये आठ एकर जमीन खरेदी करण्यात आली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर जमिनी स्थानिकांची दिशाभूल करुन प्रकल्पासाठी खरेदी करण्यात आल्याचे उघडकीस आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर जमिनीवर प्रकल्प उभारण्यात आला आहे काय, नसल्यास त्याची कारणे काय आहे,

(४) असल्यास, याबाबत शासनामार्फत सखोल चौकशी करण्यात आली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार यास जबाबदार असणाऱ्या व्यक्तीवर कोणती कारवाई करण्यात आली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (०३-०८-२०१५) :**(१), (२) व (३) मौजे तुरुंबाडी, ता.म्हसळा, जि.रायगड या गावातील ग.नं.२१,२४ व ६४ एकूण क्षेत्र ३-४०-० हे.आर. ही जमिन श्री.भंभानी शिपींग प्रा.लि.मुंबई यांच्या तर्फे डायरेक्टर हरिलाल पहलूमल भंभानी यांनी सन २००९ मध्ये खऱ्याखुऱ्या औद्योगिक कारणासाठी शिपींग व्यवसाय करण्यासाठी खरेदी केली आहे. "खऱ्याखुऱ्या औद्योगिक" प्रयोजनार्थ खरेदी केलेल्या जमिनी खरेदी पासून १५ वर्षाच्या आत वापरात आणणे बंधनकारक आहे.

तथापि, प्रस्तुत प्रकरणी श्री.भंभानी शिपींग प्रा.लि.यांनी खरेदी केलेली जमीन व खाडी यांच्या मधोमध वनविभागाची जमीन येत असल्याने वन विभागाची परवानगी आवश्यक आहे. असे कंपनी व्यवस्थापनाने कळविले आहे.

त्यामुळे कंपनीने स्थानिकांची दिशाभूल केली असल्याचे सकृतदर्शनी दिसून येत नाही.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**गडचिरोली जिल्ह्यातील शेतजमीनीचा वर्ग २ वर्ग १ मध्ये परावर्तीत करण्याबाबत**

**(२२) १११८६ (०४-०४-२०१५). श्री.बंटी भांगडिया (चिमूर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गडचिरोली जिल्ह्यातील वर्ग २ च्या शेतजमीनी वर्ग १ मध्ये परावर्तीत करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाकडे प्रलंबित आहे काय,

(२) असल्यास, खरेदी-विक्रीने मालकी हक्कादवारे वहीवाटीत असलेल्या शेतकऱ्याच्या शेतजमीनीचे वर्ग २ मधुन वर्ग १ मध्ये परावर्तन न झाल्यामुळे अनेक शेतकरी शासकीय योजनांच्या लाभापासून वंचित झालेले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, गडचिरोली व पुर्व विदर्भातील जिल्ह्यांमधील अनेक शेतकऱ्यांचे वर्ग २ च्या शेतजमीनीचे वर्ग १ मध्ये होणारे न्यायोचित परिवर्तन करण्याकरीता शासनच्या महाराष्ट्र राज्य जमीन महसूल अधिनीयम १९६६ च्या विविध कलमांमध्ये सुधारणा करण्यात येणार आहे काय,
(४) असल्यास, परिवर्तनाचा निश्चित कालावधी काय आहे ?

**श्री. एकनाथराव खडसे (२४-०७-२०१५) :**(१), (२), (३) व (४) महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६ च्या कलम २९ (२) (सी) तसेच महाराष्ट्र जमीन महसूल (विविक्षित भूमीधारकांना भोगवटदार वर्ग-१ मध्ये अंतर्भाव करण्यासाठी परवानगी देण्याबाबत) नियम १९६८ मधील तरतुदीस अनुलक्षून विदर्भातील अनिर्बाधीत भूमीधारी (भोगवटदार वर्ग-२) शेतकऱ्यांना भूमीस्वामी (भोगवटदार वर्ग-१) मध्ये परिवर्तित करण्याबाबत शासनाने दि.२ जानेवारी,२०१२ रोजीच्या परिपत्रकान्वये आवश्यक निर्देश यापूर्वीच निर्गमित केले आहेत. त्यानुसार गडचिरोली व विदर्भातील इतर जिल्ह्यात प्राप्त झालेल्या प्रकरणांमध्ये प्रकरणपरत्वे क्षेत्रिय पातळीवर निर्णय घेण्याची कार्यवाही सुरु आहे.

---

### अमरावती जिल्ह्याचे विभाजन करुन अचलपूर जिल्हा निर्मिती करण्याबाबत

**(२३) १२१६५ (०७-०४-२०१५). श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अचलपुर वि.स.स. यांनी सन २००८ मध्ये अमरावती जिल्ह्याचे विभाजन करुन अचलपूर जिल्हा निर्मितीकरीता ११ दिवस नागरवाडी येथे अन्नत्याग आंदोलन करुन दर्यापूर मेळघाट मधील धारणी, चिखलदारा, चांदुरबाजार तालुक्यातील ५० हजार लोकांच्या वतीने नविन जिल्हा निर्मितीची मागणी करुन तत्कालीन उपमुख्यमंत्री यांच्या अध्यक्षततेखाली दिनांक १३ ऑक्टोबर, २००८ रोजी झालेल्या बैठकीस सदर प्रस्ताव मंत्रालयाला आग लागल्यामुळे जळून नष्ट झाला त्यामुळे अचलपूर वि.स.स. यांनी दिनांक २३ ऑगस्ट, २०१२ रोजी पुन्हा नव्याने प्रस्ताव दिला होता, हे खरे आहे काय,
(२)असल्यास, याबाबत विलंब होण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास नविन प्रस्तावावर शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, याबाबत विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (२८-०७-२०१५) :**(१) होय.
(२), (३) व (४) जिल्हा विभाजनाचे निकष ठरविण्याकरीता गठीत करण्यात आलेल्या समितीचा अहवाल अद्यापत अप्राप्त असून सदर अहवाल प्राप्त झाल्यानंतर जिल्हा विभाजनाबाबत

शासनाचे धोरण निश्चित करण्याचे संकल्पित आहे व त्या आधारे अमरावती जिल्ह्याचे विभाजन करुन अचलपूर जिल्हा निर्मिती करण्यासंदर्भात यथोचित निर्णय घेण्याचे योजिले आहे.

---

**उपसा बंदीचे कारण पुढे करुन कोल्हापूर जिल्ह्यातील शासकीय अधिकारी जादा दराने वाळूची विक्री करीत असल्या**

**(२४) १२२७८ (०८-०४-२०१५). श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उपसा बंदीचे कारण पुढे करुन कोल्हापूर जिल्ह्यातील शासकीय अधिकारी जादा दराने वाळूची विक्री करीत असल्याचे माहे जानेवारी, २०१५ च्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून व त्यानुसार पुढे कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (०१-०९-२०१५) :**(१) व (२) असे निदर्शनास आले नाही.

कोल्हापूर जिल्ह्यात वाळू/रेती उत्खननाकरीता बंदी नाही. सन २०१४-१५ करीता कोल्हापूर जिल्ह्यात वाळू/रेती उत्खननाकरीता पर्यावरण अनुमती प्राप्त झाल्यानंतर ११९ वाळूगटाचे लिलाव घेण्यात आले. यामध्ये ४५ वाळूगटाचे लिलाव यशस्वीरीत्या होवून, संबंधित लिलावधारकांना वाळू उत्खननाकरीता मंजूरी देण्यात आली आहे. सदर वाळूगटांच्या लिलावापासून शासनास रु.२२.७५ कोटीचा महसूल प्राप्त झाला आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मा.सर्वोच्च न्यायालयाने गायरा /गुरचरण जमिनींवरील अतिक्रमणे नियमानुकूल न करण्याबाबत दिलेले आदेश**

**(२५) १२५८१ (०४-०४-२०१५). श्री.संग्राम थोपटे (भोर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मा.सर्वोच्च न्यायालयाने गायरान /गुरचरण जमिनींवरील अतिक्रमणे नियमानुकूल न करण्याबाबत दिलेल्या आदेशानुसार महसूल विभागाने दिनांक १२/७/२०११ रोजी शासन निर्णय क्र.जमीन /०३/२०११/प्र.क्र..५३/ज-१ द्वारे महसूल विभागाच्या सर्व तहसीलदारांना सदर आदेश निर्गमित केलेले आहेत हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मौजे सत्पाळा, ता.वसई, जि.पालघर येथील सर्व्हे नं.जुना १७४ नवीन ५०, क्षेत्रफळ ४२,७०० चौरस मिटर्स या गावक-यांच्या व शेतक-यांच्या गुरांसाठी व सार्वजनिक वापरासाठी असलेल्या गुरचरण जमिनीवर गेली अनेक वर्षे शेतीसाठी अतिक्रमणे करुन, सदर

गुरचरण जमिनी बळकाविण्यासाठी काही इसमांकडून कार्यवाही केली जात असल्याचे तहसीलदार, वसई यांना जुलै, २०१४ मध्ये आढळून आल्यावरही, सदर अतिक्रमणे हटविण्यासाठी कार्यवाही करण्यास तहसीलदाराकडून टाळाटाळ केली जात आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार झाल्यामुळे आवश्यक ती कार्यवाही करण्यास तहसीलदार वसई टाळाटाळ करीत असल्याने तसेच सदर अतिक्रमणे हटविण्यासाठी संबधितांनवर कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा करण्यात येत आहे ?

**श्री. एकनाथराव खडसे (२८-०७-२०१५) :**(१) होय.

(२) व (३) सदर शासन निर्णयानुसार अशी अतिक्रमणे निष्कासित करण्याची जबाबदारी संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेची असून संबंधित तहसीलदार, सार्वजनिक बांधकाम विभाग व पोलीस प्रशासनाने त्यांना साहाय्य करणे अपेक्षित आहे. तथापि, तहसिलदार, वसई यांनी दि. ६/७/२०१५ रोजी सदर जमिनीवर निष्कासनास पात्र असलेल्या घराचे बांधकाम निष्कासित करण्याची कार्यवाही केलेली आहे. त्यामुळे तहसिलदार वसई अतिक्रमणाविरुध्द कार्यवाही करण्यास हेतुपस्पर टाळाटाळ करीत आहेत असून दिसून आले नाही.

---

**लातूर जिल्हयातील लातूर येथील विभागीय आयुक्त कार्यालय**
**नांदेड येथे स्थलांतरीत करण्याबाबत**

**(२६) १२७२४ (०४-०४-२०१५). श्री.सुधाकर भालेराव (उदगीर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लातूर जिल्हयातील लातूर येथील विभागीय आयुक्त कार्यालय नांदेड येथे स्थलांतरीत करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, लातूर येथे विभागीय कार्यालयाची इमारत पूर्ण झाली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर विभागीय आयुक्त कार्यालय इमारत पूर्ण झाली असल्यामुळे सदर नांदेड येथील कार्यालय लातूर येथे स्थलांतर करण्यात यावे अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी संबंधीत विभागाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर निवेदनावर शासनाने कोणता निर्णय घेतला आहे,

(५) नसल्यास, त्याची विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (२८-०७-२०१५) :**(१) हे खरे नाही.

(२) लातूर येथे विविध विभागांतर्गत येणाऱ्या विभागीय कार्यालयांसाठी प्रशासकीय इमारतीचे बांधकाम करण्यात आलेले आहे. तथापि, विभागीय आयुक्त (महसूल) कार्यालयाकरीता स्वतंत्र इमारती बांधलेली नाही.

(३) होय.

(४) व (५) विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबादचे विभाजन करुन नव्याने निर्माण करावयाच्या विभागीय आयुक्तालयात कोणत्या जिल्ह्यांचा समावेश करावा व नवीन विभागीय आयुक्तालयाचे मुख्यालय कोणत्या ठिकाणी असावे, या विषयी सखोल अभ्यास करुन तत्संबंधी शासनास शिफारशी करण्यासाठी दि.१६.०२.२०१५ च्या शासन निर्णयान्वये विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांच्या अध्यक्षतेखाली एक-सदस्यीय अभ्यास गट स्थापन करण्यात आला असून दोन महिन्यात शिफारशी शासनास सादर करण्याचे निर्देश देण्यात आले होते.

तथापि, दि.१९.०५.२०१५ च्या शासन निर्णयान्वये सदर अभ्यासगटास त्यांनी केलेल्या विनंतीनुसार आपला अहवाल शासनास सादर करण्याकरीता दि.१६.४.२०१५ पासून पुढील ३ महिन्यापर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.

सदर अभ्यासगटाने आपला अहवाल शासनास सादर केल्यानंतर विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद विभाजन करुन नवीन विभागीय आयुक्त कार्यालय निर्माण करण्यासंदर्भात शासनाने उचित निर्णय घेण्याचे संकल्पित आहे.

---

**मस्जिद इदगाह व कब्रस्तान ट्रस्ट, भांडेवाडी, पारडी (ता.जि.नागपूर)**
**च्या खसऱ्यात फेरफार केल्याबाब**

**(२७) १३०४८ (०८-०४-२०१५). ॲड.वारीस पठाण (भायखळा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मस्जिद इदगाह व कब्रस्तान ट्रस्ट, भांडेवाडी, पारडी (ता.जि.नागपूर) च्या खसरा नं. ६, ७ व १३ वरील क्रमशः २.३२, ०.७९ व ३.२३ एकर क्षेत्रफळ असलेल्या कब्रस्तान, इदगाह आणि कब्रस्तान व मस्जिदच्या जागेवर नागपूर सुधार प्रन्यास (एन.आय.टी) आणि जिल्हाधिकारी (राजस्व), नागपूर मार्फत झालेले अतिक्रमण तसेच जवळपास १४ कबरी उध्वस्त करुन त्यावर माती टाकून केलेल्या भरावा प्रकरणी विविध सामाजिक, धार्मिक संघटना, जागरुक नागरीक व लोकप्रतिनिधी यांनी मा.मुख्यमंत्री, मा.राज्यमंत्री (नगरविकास), मा.मंत्री (गृह), मा. राज्यमंत्री (गृह) मा.मंत्री (अल्पसंख्याक विकास), जिल्हाधिकारी (नागपूर) यांचेकडे माहे ऑक्टोबर, २०१४ वा त्या सुमारास लेखी निवेदनाद्वारे चौकशीची मागणी केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी शासनातर्फे चौकशी करण्यात आली आहे काय चौकशीनुसार दोषी असणाऱ्या संबंधितांवर कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा करण्यात येत आहे ,

(३) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काेणती ?

**श्री. एकनाथराव खडसे (२४-०७-२०१५) :**(१) (२) व (३) अशा स्वरुपाची निवेदने प्राप्त झाली आहेत. भांडेवाडी ता.नागपूर (शहर) येथील खसरा क्र.१३ चे क्षेत्र व त्यालगत असलेल्या नागनदी, या मधील खड्डयामध्ये माती टाकून घेतल्याचे व ती जागा समतल केल्याचे आढळून आले आहे. अतिक्रमणाबाबत स्थानिक नागरिक यांनी केलेल्या तक्रारीवरुन पोलीस ठाणे कळमणा, नागपूर यांनी प्राथमिक माहिती अहवाल (FIR) दाखल करण्यात आलेला आहे.

---

**चंद्रपूर महानगर पालिका हददीतील नझूलच्या जागेवर वास्तव्यास राहत असलेल्या घरधारकांना मालकी हक्काचे पटटे देण्यासंदर्भात**

**(२८) १३५०० (०४-०४-२०१५). श्री.नानाजी शामकुळे (चंद्रपूर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर महानगर पालिका हददीतील नझूलच्या जागेवर वास्तव्यास राहत असलेल्या घरधारकांना शासन निर्णय ४/४/२००४ आणि १८/०६/२०११, महसूल व वन विभागाचे अधीनस्त मालकी हक्काचे पटटे देण्यासंदर्भात तातडीने कार्यवाही करण्यासाठी मा. जिल्हाधिकारी चंद्रपूर यांना निर्देश देण्याबाबतचे निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दि. २३/१२/२०१४ आणि १९/०१/२०१५ ला मा. महसूल मंत्री यांना सादर केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले आहे व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही करण्यात आली आहे, वा करण्यात येत आहे

(४) नसल्यास, विलंबाचे सर्वसाधरण कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (३१-०७-२०१५) :**(१), (२), (३) व (४) स्थानिक लोकप्रतिनिधी यांचे दि.२२.१२.२०१४ व दि.१९.०१.२०१५ चे निवेदन जिल्हाधिकारी चंद्रपूर यांना प्राप्त झाले आहे. महानगरपालिका / शहरी विभागात शासकीय जमिनीवरील झोपडपट्टींची अतिक्रमणे नियमित करण्याच्या दृष्टीने अशा अतिक्रमित जमिनीचा अभिन्यास (लेआऊट) तयार करण्यासाठी महानगरपालिका आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती गठीत करण्यात आली आहे. सदर समितीच्या शिफरशीनुसार झोपडपट्टीतील अतिक्रमित भुखंडाची मोजणी करण्याचे व पुढील कार्यवाही करण्याचे संकल्पित आहे.

---

**सांगली जिल्ह्यातील सांगली व मिरज तालुका स्वतंत्र करण्याबाबत.**

**(२९) १४११२ (०४-०४-२०१५). डॉ.सुरेश (भाऊ) खाडे (मिरज) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली जिल्ह्यातील सांगली व मिरज तालुका स्वतंत्र करण्याची मागणी स्थानिक लोकप्रातिनिधींनी दिनांक २८ मे, २०१२ व २० डिसेंबर, २०१२ आणि दिनांक २५ मार्च, २०१३ व २७ जून, २०१३ आणि २० फेब्रुवारी, २०१४ रोजी मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, स्थानिक लोकप्रतिनिधींनी म.वि.स. १०५ अन्वये लक्षवेधी सूचना व औचित्याचा मुद्दा २० जुलै, २०१२ व १८ डिसेंबर, २०१२ आणि २० मार्च, २०१३ रोजी सभागृहासमोर उपस्थित केला होता, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, पलुस कडेगाव हे तालुके स्वतंत्र झाले असताना गेल्या अनेक वर्षापासून मागणी असलेल्या सांगली व मिरजबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी, मिरज यांनी शासनाकडे वारंवार पाठपुरावा केला असतानाही अद्यापपर्यंत निर्णय झालेला नाही, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, अद्याप निर्णय न होण्याची कारणे काय आहेत व उक्त निर्णय केव्हापर्यंत होणे अपेक्षित आहे ?

**श्री. एकनाथराव खडसे (२८-०७-२०१५)** :(१) होय.

(२) सदर मागणीबाबतची लक्षवेधी सूचना प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही.

मात्र, विशेष बाब म्हणून दि. २०/०७/२०१२ रोजी प्रस्तुत विषयीचा औचित्याचा मुद्दा विधानसभेत उपस्थित करण्यात आला होता.

(३) व (४) राज्यातील तालुका पुनर्रचेबाबतचे निकष ठरविण्याकरीता गठीत करण्यात आलेल्या समितीचा अहवाल प्राप्त झाला असून सदर अहवालानुसार तालुका पुनर्रचेबाबतचे शासनाचे धोरण निश्चित करण्याचे संकल्पित आहे व त्या आधारेच सांगली जिल्ह्यातील सांगली व मिरज तालुका स्वतंत्र करणेबाबतचा यथोचित निर्णय घेण्याचे योजिले आहे.

---

**महसूल आणि वन विभागच्या जमिनींवर उपजीविका करणाऱ्या नागपूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांना सरकारने त्या जमिनीचे हक्क देण्याबाबत**

**(३०) १४२५७ (०८-०४-२०१५). श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महसूल आणि वन विभागाच्या जमिनींवर वर्षानुवर्षे उपजीविका करणाऱ्या नागपूर जिल्ह्यातील शेतक-यांना सरकारने त्या जमिनीचे हक्क देण्याचा निर्णय घेतल्यानंतर ९० हजार ४५२ शेतक-यांनी दावे सादर केले व त्यातील ३६ हजार ५१६ दावे निकाली काढले परंतु सुमारे ५५ हजार दावे नाकारल्याने वर्षानुवर्षे शेती करणा-या शेतक-यांचा उपजीविकेचा प्रश्न निर्माण झाल्याचे माहे फेब्रुवारी, २०१५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त ५५ हजार दावे नाकारण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, उक्त ५५ हजार शेतक-यांच्या उपजीविकेचा प्रश्न निकाली काढण्याबाबत शासनाची भूमिका काय आहे ?

**श्री. एकनाथराव खडसे (२४-०७-२०१५)** :(१), (२) व (३) अनुसुचित जमाती व इतर पारंपारिक वननिवासी (वन हक्काची मान्यता) अधिनियम २००६ अन्वये माहे फेब्रुवारी २०१५ पर्यंत नागपूर जिल्ह्यातील ग्रामसमितीकडे एकूण २२३५ वैयक्तिक दावे प्राप्त झाले. त्यापैकी ग्रामसभेमध्ये १२५३ दावे पात्र व ९८२ अपात्र केले गेले. सदर १२५३ पात्र प्रकरणांपैकी उपविभागीय समितीच्या सभेमध्ये ५०८ दावे पात्र करण्यात करण्यात आले व ७४५ दावे अपात्र केले गेले. जिल्हास्तरीय समितीकडे प्राप्त झालेल्या ५०८ दाव्यांपैकी ४९५ दावे पात्र करण्यात आले व १३ दावे पुराव्या अभावी अपात्र करण्यात आले.

आदिवासीनी दिनांक १३.१२.२००५ पुर्वीचे अतिक्रमणाबाबतचे पुरावे दिले नसल्यामुळे व गैर आदिवासींनी ७५ वर्षाचा अतिक्रमणाचा पुरावा म्हणजे तीन पिढ्यांचा अतिकमणाचा पुरावा दिला नसल्यामुळे सदर दावे नाकारण्यात आले आहेत.

नामंजूर प्रकरणांमध्ये व्यथित आवेदकाला उक्त कायद्याच्या कलम ६(४) अन्वये आदेश मिळाल्यानंतर जिल्हास्तरीय समितीकडे ६० दिवसाच्या आत अपिल करण्याची संधी आहे.

---

**मौजे उमराळे (ता.वसई, जि.पालघर) येथील शेत जमिनीवर जाण्या येण्यासाठी वहिवाटीचा रस्ता मोकळा करण्याबाबत**

**(३१) १४९३८ (०७-०४-२०१५). प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे उमराळे (ता.वसई, जि.पालघर) येथील शेत जमिनीवर जाण्या येण्यासाठी असलेल्या वहिवाटीच्या रस्त्याची पाहणी केल्यानंतर शेती करण्यासाठी नांगरबैल, बैलगाडी व टॅक्टर वगैरे यांची ने आण करण्याकरिता सुमारे ५ फुट रुंदीचा वहिवाटीचा रस्ता असणे न्यायाच्या दृष्टीने आवश्यक आहे असा निष्कर्ष करुन वहिवाटीच्या रस्त्यातील भिंतीचे बांधकाम पाडून ५ फूट रुंदीचा रस्ता मोकळा करावा असा आदेश तहसिलदार, वसई यांनी दिनांक २४ ऑक्टोबर, २००८ पासून फेरचौकशी दावा क्र.६ /२००८ अन्वये कार्यवाही चालू केली असून दिनांक १४ डिसेंबर, २०१० रोजी स्थळ पाहणी करुन पंचनामा केला आहे व या प्रकरणी युक्तीवाद पूर्ण होऊन ऑक्टोबर, २०११ रोजी प्रकरण निर्णयासाठी ठेवण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी अद्यापपर्यंत निर्णय देण्यात न आल्यामुळे अनेक शेतकऱ्यांना त्यांच्या शेतजमिनीवर नांगरबैल, ट्रॅक्टर इत्यादींची ने-आण करण्यास अडथळा निर्माण झाल्यामुळे गेली ८ वर्षे त्यांना शेती करता आलेली नसल्याने याप्रकरणी वहिवाटीचा रस्ता मोकळा करण्यासाठी कोणती कारवाई करण्यात आली आहे वा येत आहे ?

**श्री. एकनाथराव खडसे (१७-०८-२०१५) :**(१) प्रस्तुत प्रकरणात मामलेदार कोर्ट अधिनियमाखाली फेरचौकशी दावा क्र.०६/२००८ अन्वये कार्यवाही सुरु होती. त्यानुसार दि.१४/१२/२०१० रोजी स्थळ पाहणी करुन पंचनामा करण्यात आला होता. सदर दावा दि.१९/०७/२०१३ रोजी तत्कालीन तहसिलदार यांनी निर्णयासाठी बंद केला होता.

(२) सदर प्रकरणी तहसिलदार वसई यांनी मामलेदार कोर्ट अधिनियमान्वये फेरचौकशी करुन दाव्यामध्ये नमूद केलेला रस्ता पुर्वापार जाणेयेणेचा असल्याचे सिध्द झाल्याने ५ फुट रुंदीचा रस्ता मोकळा करुन देणेबाबत दि.७/७/२०१५ रोजी आदेश पारित केले आहेत.

---

**नागपूर ग्रामीण मधील भोकरा नाल्यावर अनेक लेआऊटच्या मालकांनी अतिक्रमण करुन त्यावर भूखंड पाडल्याबाबत**

**(३२) १५२०७ (०८-०४-२०१५). श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री.कृष्णा खोपडे (नागपूर पूर्व), श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य), श्री.सुधाकर कोहळे (नागपूर दक्षिण), डॉ.आशिष देशमुख (काटोल) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर ग्रामीण मधील मौ. गाधनी, खसरा क्र.८३ व मौ.भोकरास, खसरा क्र.१०४ या दोन गावाच्यामध्ये असलेल्या भोकरा नाल्यावर अनेक लेआऊटच्या मालकांनी अतिक्रमण करुन त्यावर भूखंड पाडल्याबाबतचे वृत्त दिनांक २६ जानेवारी, २०१५ रोजी उघडकीस आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर जागेची दोन्ही मौजांनी पडताळणी केली असता ती जागा शिव धुऱ्यांची असून दोन गावांची पांदण आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या दोन मौजाच्या लेआऊट मालकांनी ग्रामपंचायती, तलाठी, ग्रामीण तहसीलदार व नगर भूमापन अधिकारी यांच्या संगलमताने भोकारा नाल्यावर अतिक्रमण करुन लेआऊट पाहुन विक्रि केली, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या दोन्ही मौजांच्या लोआऊट मालकांनी मोजणी केली असता सदर भूखंडाच्या मोजणीत सुध्दा गैरव्यवहार झाल्याचे समजते, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, या दोन्ही मौजाच्या लेआऊट मोजणीत गैरव्यवहार करणाऱ्या अधिकाऱ्यांवर व व्यक्तींवर कडक कायदेशीर कार्यवाही करण्यात आली आहे काय,
(६) नसल्यास, कडक कार्यवाही न करण्याची कारणे काय ?

**श्री. एकनाथराव खडसे (२४-०७-२०१५) :**(१) (२) (३) (४) (५) व (६) मौजा गोधनी खसरा क्र.८३ व मौजा बोखारा, खसरा क्र.१०४ यामध्ये शिवधुरा नाही. मौजा गोधनी रेल्वे येथील खसरा क्र.८३ ला लागून मौजा बोखाराची शिव आहे, व त्यालगत खसरा क्र.१४० आहे.

मौजा गोधनी रेल्वे येथील खसरा क्र.८३ हा कृषिक असून मोक्यावर गाव नमुना नं. ७/१२ वरील मालकाव्यतिकरक्त इतर लोकांनी घरे बांधून कब्जा केलेला असून शेतमालकाने अनधिकृत भूखंड पाडलेले आहेत. त्यामुळे संबंधितांवर तहसिलदार मार्फत कार्यवाही सुरु आहे.

मौजा बोखारा येथील गट क्र.१०३ येथे नाल्यावर संरक्षक भिंतीचे अतिक्रमण दि.२०.०१.२०१५ रोजी काढण्यात आले असून खसरा क्र.१०४ वरील घरांचे अतिक्रमण काढण्यास मा.सह दिवाणी न्यायाधिश वरिष्ठस्तर, नागपूर यांनी स्थगिती दिली आहे.

---

**महाराष्ट्र वीज मंडळामध्ये कामगारांच्या रिक्त असलेल्या जागा भरण्याबाबत**

**(३३) १५३३० (०८-०४-२०१५). श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री.कृष्णा खोपडे (नागपूर पूर्व), श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य), श्री.सुधाकर कोहळे (नागपूर दक्षिण), डॉ.आशिष देशमुख (काटोल) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र वीज मंडळामध्ये हजारो कामगारांच्या जागा रिक्त असताना कामगार भरती केली जात नाही असे माहे नोव्हेंबर, २०१४ रोजी निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अनेक वर्षापासून वीज मंडळामध्ये रोजंदारी/ठेकेदारी पध्दतीने कामगार काम करतात, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, रोजंदारी/ठेकेदारी पध्दतीने काम करणा-या कामगाराना वीज मंडळामध्ये कायम करण्यासाठी शासनान काय निर्णय घेतला आहे वा घेण्यात येत आहे ,
(४) असल्यास, त्या निर्णयाचे स्वरुप काय आहे,

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१०-०८-२०१५) :**(१) हे अशंतः खरे आहे,

महावितरण, महानिर्मिती व महापारेषण या कंपन्यामधील रिक्त पदे भरण्याची कार्यवाही सुरु आहे.

(२) हे अशंत: खरे आहे

कंपन्याच्या कामाच्या स्वरुपानुसार ठेकेदारांमार्फत बाह्यस्त्रोतातून कंत्राटी कामगार नियुक्त केले जातात.

(३) रोजंदारी/ठेकेदारी पध्दतीने काम करणारे कर्मचारी हे महावितरण, महानिर्मिती व महापारेषण व कंपन्यांचे कर्मचारी नसून, ते ठेकेदारांचे कर्मचारी आहेत. त्यामुळे सदरील कर्मचाऱ्यांना कंपन्यांमध्ये कायम करता येत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**वाशिम जिल्हयात १८ रेतीघाट लिलावाच्या प्रतिक्षेत असल्याबाबत**

**(३४) १५६५६ (०८-०४-२०१५). श्री.लखन मलिक (वाशिम) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाशिम जिल्हयात १२ फेब्रुवारी २०१५ पर्यंत २७ पैकी केवळ ९ रेतीघाटांचा लिलाव झाला असून १८ रेतीघाट लिलावाच्या प्रतिक्षेत आहेत, हे खरे आहे काय ?

(२) असल्यास, सदरहू रेती घाटांचा लिलाव न झाल्याने रेती उपसा बंद आहे, त्यामुळे जिल्हयातील शासकीय योजनेतून घेतलेल्या घरकुल व शौचालय बांधकामास विलंब होत आहे, हे ही खरे आहे काय ?

(३) असल्यास, उर्वरित १८ रेतीघाटांना तातडीने मंजुरी देण्याबाबत शासनाची भूमिका काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (०१-०९-२०१५) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) असे निदर्शनास आले नाही.

(३) शासनाच्या वाळू/रेती निर्गती धोरणातील मीतुदीनुसार वाशिम जिल्हयात लिलावात न गेलेल्या वाळूगटांचे फेर लिलाव केले असता, आणखी ३ वाळू गट लिलावात गेले असून, उर्वरित १५ वाळूगटांचा फेर लिलाव विचाराधीन आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मुंबईतील शिवदास चापसी मार्ग, सी.एस.क्र. १२६ या मालमत्तेचा कच्छी लोहाना निवास ट्रस्टीच्या सदस्यांनी केलेल्या अवैघ हस्तांतरणाबाबत**

**(३५) १५७३५ (०८-०४-२०१५). श्री.रामचंद्र अवसरे (भंडारा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील शिवदास चापसी मार्ग, सी.एस.क्र. १२६ या मालमत्तेचा भाडेपट्टा संपलेला व अधिकारी नसलेल्या, कच्छी लोहाना निवास ट्रस्टीच्या सदस्यांनी केलेल्या अवैघ हस्तांतरणाबाबत विभागीय आयुक्त कोकण विभाग यांनी चौकशी अहवाल सादर करुनही अद्याप शासनाने यावर कोणतीच कार्यवाही केली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यस, सदरहू चौकशी अहवालावर कार्यवाही करण्यास शासनास लागत असलेल्या विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहत,
(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी अहवालानूसार कार्यवाही केली आहे काय,
(४) असल्यास, याबाबत केलेल्य कार्यवाहीची सद्यःस्थिती काय आहे,
(५) असल्यास, सदरहू शासनाची पनरवानगी न घेता अवैध हस्तांतरण झालेली मिळकत सरकार जमा करण्याच्या दृष्टीने शासनातर्फे किती निश्चित कालावधीत कार्यवाही करणे अपेक्षित आहे ?

**श्री. एकनाथराव खडसे (०४-०८-२०१५) :**(१), (२), (३), (४) व (५) प्रश्नाधीन मालमत्तेच्या हस्तांतरणाबाबत प्राप्त झालेल्या तक्रारींच्या अनुषंगाने विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांनी त्यांच्या दिनांक १२.८.२०१४ च्या पत्रान्वये शासनास अहवाल सादर केला आहे. मात्र उक्त अहवालावर कार्यवाही होण्यापूर्वीच त्या अहवालाबाबत काही तक्रारी प्राप्त झाल्याने संबंधित तक्रारदारांच्या तक्रारी ऐकून घेण्यासाठी प्रधान सचिव (महसूल) यांच्याकडे दिनांक १७.४.२०१५ रोजी चर्चा आयोजित करण्यात आली होती. त्यानुषंगाने तक्रारदारांकडून प्राप्त लेखी व तोंडी निवेदनांची छाननी करण्याची कार्यवाही सुरु आहे.

---

**विरदेल आणि खलाणे (ता.शिंदखेडा, जि.धुळे) येथील मंडळाधिकारी व तलाठी यांच्या बाबतीत तक्रारी असल्याबाबत**

**(३६) १५९६० (०८-०४-२०१५). श्री.जयकुमार रावल (शिंदखेडा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) विरदेल आणि खलाणे (ता.शिंदखेडा, जि.धुळे) येथील मंडळाधिकारी व तलाठी यांच्या विरोधात सबंधीत महसुल मंडळातील गावांमधुन मोठया प्रमाणावर तक्रारी तहसिलदार शिंदखेडा, जिल्हाधिकारी, धुळे यांच्याकडे माहे ऑक्टोबर-नोव्हेंबर २०१४ मध्ये करण्यात आलेल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याप्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय चौकशी काय आढळून आले व त्यानुसार संबंधितांवर कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (०२-०९-२०१५) :** (१) व (२) संबंधित तलाठी व मंडळ अधिकारी यांच्या संदर्भात तक्रार प्राप्त झाली आहे. सदर तक्रार अर्जाच्या अनुषंगाने उपविभागीय अधिकारी, शिरपूर यांच्यामार्फत चौकशी करण्यात आली असून संबंधित तलाठी व मंडळ अधिकारी यांची बदली करण्यात आली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**माण व खटाव (जि.सातारा) या तालुक्यातील तलाठ्यांनी**
**वाळू माफियावर गुन्हे दाखल केल्याबाबत**

**(३७) १६०१९ (०८-०४-२०१५). श्री.जयकुमार गोरे (माण) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माण व खटाव (जि.सातारा) या तालुक्यातील तलाठी यांनी मरोळ येथे सुमारे ५८१२ ब्रास वाळूचे पंचनामे करण्यात येऊन सुमारे ४७ वाळू माफियावर गुन्हे दाखल करून त्यांच्याकडून सुमारे २० लाख रूपये दंड वसूल करण्यात आला असल्यामुळे संबंधित तलाठयांना वाळू माफियांन पासून धोका असल्यामुळे नवीन नियमाप्रमाणे वाळू चोरी पकडण्यासाठी पोलीस संरक्षण देणे गरजेचे असतानाही त्यांना पोलीस संरक्षण न देता तलाठयांना व मंडळाधिकारी यांना दोषी ठरवून त्यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई करुन त्यांना निलंबित करण्यात आल्याने तलाठयांचे निलंबन मागे घेण्यासाठी तसेच माणमधील मंडळाधिका-यांवर करण्यात आलेली कारवाई रद्द करण्यासाठी माण व खटाव तालुक्यातील सर्व तलाठयांनी माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान लेखणीबंद आंदोलन करण्यात आले,होते हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तलाठयांचे निलंबन मागे घेण्याबाबत तसेच माणमधील मंडळाधिकारी यांचेवर करण्यात आलेली कारवाई रद्द करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप, कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (०१-०९-२०१५) :**(१) संबंधित तलाठ्यास निलंबित करण्यात आले असल्याने तलाठी संघटनेने माहे जानेवारी, २०१५ मध्ये लेखणीबंद आंदोलन केले होते, हे खरे आहे.

(२) संबंधित तलाठ्यांचे निलंबन मागे घेण्यात आले आहे. तसेच मंडळ अधिकारी यांचेवर कोणतीही कारवाई प्रस्तावीत करण्यात आलेली नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अत्यल्प कमिशन मिळत असल्याने राज्यात दुध विक्रेता कल्याणकारी संघातर्फे**
**आंदोलन पुकारुन ब्रॅण्डेड कंपन्यांच्या दूधावर बहिस्कार घातल्याबाबत**

**(३८) १६५९५ (०६-०८-२०१५). श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.किसन कथोरे (मुरबाड), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.संजय**

**केळकर (ठाणे), श्री.सुधाकर भालेराव (उदगीर), श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल), श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.गुलाबराव पाटील (जळगाव ग्रामीण), श्री.अर्जुन खोतकर (जालना), डॉ.संजय रायमुलकर (मेहकर), डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.भाऊसाहेब कांबळे (श्रीरामपूर), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे) :** सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमूल, गोकुळ, मदर डेअरी, वारणा व महानंद या दूध कंपन्याकडून अत्यल्प कमिशन मिळत असल्याचा आरोप करत ठाणे शहर दुध विक्रेता कल्याणकारी संघातर्फे आंदोलन पुकारुन ब्रॅण्डेड कंपन्यांच्या दुधावर बहिष्कार घातल्याचे दिनांक २५ एप्रिल, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या कंपन्या-विक्रेतांचा वाद मिटविण्यासाठी शासनस्तरावरुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (२९-०८-२०१५) :**(१) दि.२५ एप्रिल,२०१५ च्या सुमारास मुंबई शहर वगळता ठाणे शहर दूध व्यावसायिक कल्याणकारी संघ व पनवेल, खांदा कॉलनी, नवीन पनवेल या परिसरातील दूध विक्रेत्यांनी गोकूळ, महानंद, वारणा, अमूल व मदर डेअरी या पाच दूध कंपन्यांच्या दूध विक्रिवर बहिष्कार टाकला होता हे खरे आहे.

(२) विक्रेत्यांचे कमिशन ठरविणे ही बाब वितरक व दूध पुरवठादार कंपनी यांचेशी संबधित असून हा प्रश्न त्यांच्यात परस्पर सामंजस्याने सुटला आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### मंगळवेढा (जिल्हा सोलापूर) दुष्काळी तालुक्यात शेतकऱ्यांना दुधाच्या कमी दरामुळे महिन्याकाठी सहा कोटी रुपयाचे नुकसान होत असल्याबाबत

**(३९) १६६७९ (१०-०८-२०१५). श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मंगळवेढा (जिल्हा सोलापूर) येथील दुष्काळी तालुका असल्याने या परिसरात शेतीसाठी पाणी मिळत नसतानाही शेतकऱ्यांनी दुध वाढवून शेतीला पुरक म्हणून या व्यवसायातून आपला जगण्याचा मार्ग शोधला असून सध्या तालुक्यात २.२५ लाख लिटर दुधाचे उत्पादन होत आहे, परंतु शेतकऱ्यांना दुधाच्या कमी दरामुळे महिन्याकाठी सहा कोटी रुपयाचे नुकसान होत असल्याचे माहे मे, २०१५ रोजी वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील दुध उत्पादकांना दिलासा देण्यासाठी दुध दर वाढवून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (२९-०८-२०१५)** :(१) मंगळवेढा तालुक्यातील मे, जून व जुलै,२०१५ मधील दूध संकलन अनुक्रमे १.७५ लाख, १.४५ लाख व १.३० लाख लिटर असे आहे.

आंतरराष्ट्रीय बाजारातील दूध भुकटीच्या दरात मोठ्या प्रमाणावर घसरण झाल्यामुळे तसेच दुध भुकटीच्या आंतरराष्ट्रीय मागणीत घट झाल्याने खाजगी दूध भुकटी प्रकल्पांनी व काही सहकारी दूध संघांनी त्यांचे दूध खरेदी दर कमी केल्यामुळे दूध उत्पादकांचे काही प्रमाणात नुकसान झाले आहे हे खरे आहे.

(२) दि.१६ डिसेंबर,२०१४ रोजी नागपूर विधीमंडळ अधिवेशन काळात मा.मुख्यमंत्री व मा.विधानसभा अध्यक्ष यांच्या समवेत संबंधित लोकप्रतिनिधींच्या बैठकीत झालेल्या निर्णयानुसार सहकारी संघांकडे अतिरिक्त स्वरुपात संकलित होणारे दूध खरेदी दराने स्विकारले आहे. शासनाचे दूध खरेदी दर रु. २०/- अधिक २.५० वरकड खर्च असे मिळून रु. २२.५० प्रतिलिटर असे आहेत.

या शिवाय शासनाने निश्चित केलेले दूध खरेदीचे दर (वरकड खर्चासह) हा प्रमाणक दर समजून राज्यातील सहकारी दूध संस्था /दूध संघांनी दूध उत्पादक शेतकऱ्यांना हाच दूध खरेदी दर वेळोवेळी निर्गमित होणाऱ्या शासन निर्णयाच्या दिनांकापासून देणे आवश्यक आहे, असे निदेश महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० च्या कलम ७९ अ अन्वये दि.१०.७.२०१५ रोजी निर्गमित केले आहेत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पावसाची अनियमितता वैरण नियोजनाच्या अभावामुळे अमरावती जिल्ह्यातील पशुपालन शेतकऱ्यांना चाराटंचईचा सामना करावा लागत असल्याबाबत**

**(४०) १६८१४ (१०-०८-२०१५). ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पावसाची अनियमितता आणि वैरण नियोजनाच्या अभावामुळे अमरावती जिल्ह्यातील पशुपालन शेतकऱ्यांना चाराटंचईचा सामना करावा लागत असून बाजारात ढेपेसह पशुखाद्यांचे भावही वाढले असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अमरावती जिल्ह्यात मोठे वनक्षेत्र आहे पण नैसर्गिक कुरणेही संकुचित होत चालली असून या कुरणांचे व्यवस्थापन व विकास कारणे आवश्यक असताना त्याकडे दुर्लक्ष होत आहे मुबलक चारा उपलब्ध होण्याच्या दृष्टीने अंजनसारख्या वृक्षांची लागवड, गवताच्या कुरणांचा विकास अशा उपाययोजना वनखाऱ्यांच्या सहकार्यने हाती घेणे, कृषी विभागाच्या

सहाकार्याने शेताच्या बांधावर चारा उत्पादक वृक्षांची लागवड करणे अशा उपाययोजना सुचविण्यात आल्या असल्याने याबाबत शासन कार्यवाही करणार आहे वा करीत आहे काय,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (०१-०९-२०१५)** :(१) हे खरे नाही.
(२) अमरावती जिल्ह्याच्या सन २०११-१२ च्या जमीन वर्गीकरणानुसार जिल्ह्यात ३,०९,९०० हेक्टर वनक्षेत्र असुन, ३३,२०० हेक्टर कायम कुरणाखालील गवती क्षेत्र आहे. या पासुन सर्वसाधारणपणे वार्षिक ३.१६ लक्ष मे.टन गवताचे उत्पादन प्राप्त होते.
कृषि विभागाच्या सहकार्याने जिल्ह्यात गतिमान वैरण विकास कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नांदेड जिल्ह्यातील १४ तालुक्यांत चारा टंचाईचे संकट तीव्र झालेअसल्याबाबत**

**(४१) १७१४४ (०६-०८-२०१५). श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नांदेड जिल्ह्यातील १४ तालुक्यांत चारा टंचाई झाले असल्याचे दिनांक ५ मे, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, चा-याचे वाढते दर आणि त्यापेक्षा निर्माण झालेली टंचाई यामुळे जिल्ह्यात ३ लाख २८ हजार ६०८ मेट्रीक टन चा-याची कमतरता निर्माण झाली आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, चाऱ्याची कमतरता दूर करण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (०१-०९-२०१५)** :(१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) व (४) बाबत प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात सौर कृषिपंप बसवण्याकरिता बृहन्मुंबईतील सर्व वीज ग्राहकांवर,शहरांतील उद्योग व वाणिज्य ग्राहकांवर वाढीव वीज विक्रीकर भरावा लागणार असल्याबाबत**

**(४२) १७२२४ (०६-०८-२०१५). श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.जयकुमार गोरे (माण), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.गुलाबराव पाटील (जळगाव**

**ग्रामीण), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.अर्जुन खोतकर (जालना), डॉ.संजय रायमुलकर (मेहकर), श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत), श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल), श्री.अजय चौधरी (शिवडी), डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.चंद्रदीप नरके (करवीर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात ७५४० सौर कृषिपंप बसवण्याकरिता बृहन्मुंबईतील सर्व वीज ग्राहकांवर प्रति युनिट १.०४ पैसे वीज विक्रीकराचा भार टाकण्यात आला आहे तर अन्य शहरांतील उद्योग व वाणिज्य ग्राहकांना हा वाढीव वीज विक्रीकर भरावा लागणार असल्याचे दिनांक १७ एप्रिल, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबईकरांच्या वीजग्राहकांवर सौपपंपाचा भार देण्याबाबत नागरिकांमध्ये तीव्र असंतोष आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शहरातील वीजग्राहकांवर हा अन्याय दुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप उक्त प्रश्नाबाबत कोणतीच कार्यवाही होत नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०१-०९-२०१५) :**(१) हे खरे नाही. अधिसूचना दि.२१.४.२०१५ अन्वये बृहन्मुंबईतील सर्व वीज ग्राहकांवर प्रति युनिट १.०४ पैसे विज विक्रीकराचा भार टाकण्यात आला आहे, तर अन्य शहरांतील उद्योग व वाणिज्य ग्राहकांना हा वाढीव वीज विक्रीकर भरावा लागणार आहे.

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### उरण तालुक्यातील वधणे ग्रुप ग्रामपंचायत येथील पशुवैद्यकीय दावाखान्याची झालेली दुरावस्था

**(४३) १७३७० (०६-०८-२०१५). श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.संग्राम थोपटे (भोर), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उरण तालुक्यातील वधणे ग्रुप ग्रामपंचायत येथील पशुवैद्यकीय दावाखान्याची दुरावस्था झाल्याने आजारी प्राण्यांना उपचार न मिळाल्याने ते मृत पावत असल्याचे माहे मे, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, येथील पशुवैद्यकीय दवाखान्याच्या इमारतीचे नव्याने बांधकाम करणे व तेथे आवश्यक ती औषधे उपलब्ध करुन देण्याबाबत शसनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (२९-०८-२०१५)** :(१) दवाखान्याच्या इमारतीची दुरावस्था झालेली आहे हे खरे आहे. तथापि, माहे मे,२०१५ या दरम्यान आजारी जनावरांना उपचार न मिळाल्याने मृत पावत असल्याची बाब निदर्शनास आलेली नाही.

(२) पशुवैद्यकीय दवाखाना वधणे ता.उरण येथील इमारतीचे नव्याने बांधकामास वित्तीय वर्ष सन २०१२-२०१३ मध्ये जिल्हा वार्षिक योजनेतून रु. १०.०० लक्ष निधी वितरीत करणेत आला होता. तसेच जिल्हा परिषद सेस व जिल्हा वार्षिक योजनेतून सदरचे दवाखान्यास आवश्यक ती औषधे उपलब्ध करुन देण्यात आलेली होती. सद्यस्थितीत दवाखान्यात औषधांचा मुबलक साठा उपलब्ध आहे.

(३) पशुवैद्यकीय दवाखाना वधणे, ता.उरण, येथील नवीन इमारतीच्या कामाची ई-निविदा प्रसिध्द करण्यात आली होती. तथापि, सदर निविदेस दोनदा मुदतवाढ देऊनही कोणताही प्रतिसाद न मिळाल्याने सदरची रक्कम अखर्चित राहिली आहे.

---

### दुधनोळी (ता.मुरबाड, जि.ठाणे) येथील अनेक शेळ्या गंभीर आजारामुळे मृत्यू पावल्याबाबत

**(४४) १७८६८ (०६-०८-२०१५). श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्यातील मुरबाड तालुक्यातील दुधनोळी येथील अनेक शेळ्या गंभीर आजारामुळे दिनांक ३०/४/२०१५ रोजी मृत्यू पावल्या आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, शेळीपालन करणाऱ्यांना मदत करण्यासंदर्भात आतापर्यंत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (२९-०८-२०१५)** :(१) हे अंशत: खरे आहे, दिनांक ०१/०४/२०१५ ते १४/०४/२०१५ या दरम्यान ठाणे जिल्ह्यातील मुरबाड तालुक्यातील दुधनोळी येथे पावसात भिजल्याने झालेल्या न्युमोनिया या आजाराने ८ शेळ्या मृत्यूमुखी पडल्या आहे.

(२) दुधनोळी येथील शेळ्यांचे मर्तुकीबाबत माहिती मिळताच पशुधन विकास अधिकारी, पशुवैद्यकीय दवाखाना श्रेणी-१, धसई यांनी दि.१३/०४/२०१५ रोजी भेट देऊन आजारी शेळ्यांवर त्वरीत औषधोपचार सुरु केले दि.१३/०४/२०१५ ते २०/०४/२०१५ या कालावधीमध्ये एकूण २५ शेळ्यांवर उपचार करण्यात आला. त्यापैकी दि.१४/०४/२०१५ रोजी ३ शेळ्या मृत्यु पावल्या त्यांचे शव विच्छेदन करण्यात आले. उर्वरित २२ शेळ्याचे औषधोपचारामुळे प्राण वाचले. दि.१५/०४/२०१५ वा त्यानंतर शेळ्यांची मर्तुक झालेली नाही.

(३) सदर शेळ्या पावसात भिजल्याने न्युमोनिया या आजाराने मृत्यूमुखी पडल्या आहेत ही बाब नैसर्गिक आपत्तीमध्ये येत नसल्याने त्यांना शासनाची मदत देय नाही. तसेच सदर शेळ्यांचा विमा नसल्याने विमा भरपाई देता आली नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**उदगीर (जि.लातूर) येथे सर्व पशु चिकित्सालय सुरू करण्याबाबत**

**(४५) १७९८६ (०६-०८-२०१५). श्री.सुधाकर भालेराव (उदगीर), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लातूर, उस्मानाबाद, बीड, नांदेड व सोलापूर या पाच जिल्हयातील पशुपालकांच्या जनावरांवर उपचार करण्यासाठी लातूर जिल्हयातील उदगीर येथे सर्वपशुचिकित्सालय सुरू करण्याच्या प्रस्तावाला शासनाने ऑक्टोबर, २००७ मध्ये मंजूरी दिली होती हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रस्तावा संदर्भात मा.मंत्री महोदयांनी दोन वेळा ओदश देऊनही हा प्रस्ताव अद्याप ही प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उदगीर येथे सर्व पशु चिकित्सालय सुरू करण्याचा प्रस्ताव अद्याप ही प्रलंबित असण्याची कारणे काय व याबाबतची सद्य:स्थिती काय आहे ?

**श्री. एकनाथराव खडसे (०१-०९-२०१५)** :(१) हे खरे नाही.

लातुर जिल्हयातील उदगीर या तालुक्याच्या ठिकाणी तालुका लघुपशुवैद्यकीय सर्वचिकित्सालय कार्यरत आहे. तसेच पशुवैद्यक व पशुविज्ञान महाविद्यालय, उदगीर येथे अत्याधुनिक सोयी सुविधा व यंत्र सामुग्रीचे सुसज्ज असे महाविद्यालयाचे पशुसर्वचिकित्सालय देखील कार्यरत आहे. त्यामुळे उदगीर येथे पशुसर्वचिकित्सालय सुरु करणे प्रस्तावित नाही किंबहुना ते सुरु करण्यास शासनाची मंजुरी प्राप्त नाही.

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**औरंगाबाद तालुक्यातील गोलटगाव येथील जिल्हापरिषदेच्या पशुचिकित्सालयात जनावरांवरील उपचारासाठी औषध उपलब्ध नसल्याबाबत**

**(४६) १८०२४ (१०-०८-२०१५). श्री.अतुल सावे (औरंगाबाद पूर्व) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद तालुक्यातील गोलटगाव येथील जिल्हापरिषदेच्या श्रेणी-२ च्या पशुचिकित्सालयात जनावरांवरील उपचारासाठी लागणारे औषध उपलब्ध नसल्याने त्या परिसरातील कोणगांव, दरकवाडी, घारेगांव, काराडे, लालवाडी, बंदाचीवाडी या गावातील २६ हजार जनावरांच्या आरोग्याची जबाबदारी पशुपालकांना खाजगीरित्या औषधे आणून करावी लागत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पशुचिकित्सालयात जनावरांवर उपचार करण्यासाठी लागणारे जंतनाशक, गोचिडनाशक औषधी व प्रतिजैविक वेदनाशामक गोळ्या, लसिचे इंजेक्शन डीएनएस या सलाईन कॅल्शीयम व महत्वाची ॲन्टीरेबीज लस या पुरवठा आतापर्यंत न होण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, सदर औषधे किती कालावधीत उपलब्ध करुन देण्यात येणार आहेत वा येत आहे
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (०१-०९-२०१५)** :(१) हे खरे नाही.

पशुवैद्‌यकीय दवाखाना श्रेणी-२ गोलटगाव येथे आजारी जनावरांच्या दैनंदिन औषधोपचारासाठी आवश्यक औषधांचा पुरवठा करण्यात आलेला असुन, त्याचा पुरवठा पशुपालकांना मोफत करण्यात येतो. क्वचित प्रसंगी दवाखान्यात उपलब्ध नसलेली व अत्यावश्यक असलेली औषधी पशुपालकांना विकत आणावी लागतात.
(२), (३) व (४) बाबत प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**दाभोळ येथील तत्कालिन एन्रॉन वीज प्रकल्पाशी संलग्न असणाऱ्या मुंबईतील बेक्टेल इंटरनॅशनल इन्कॉ या कंपनीला राज्य सरकारने तब्बल ४२ कोटी ४९ लाखांची करमाफी दिल्याबाबत**

**(४७) १८४१५ (१०-०८-२०१५). श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दाभोळ येथील तत्कालिन एन्रॉन वीज प्रकल्पाशी संलग्न असणाऱ्या मुंबईतील बेक्टेल इंटरनॅशनल इन्कॉ या कंपनीला राज्य सरकारने तब्बल ४२ कोटी ४९ लाखांची करमाफी दिली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास बंधमुक्त करार झालेला असतना बेक्टेल कंपनीला करमाफी देवू नये, असा अभिप्राय विधी व न्याय विभागाने देवूनही राज्य सरकारने ही करमाफी दिली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या कंपनीला एवढया मोठ्या प्रमाणात करमाफी देण्याची कारणे काय आहेत,
(४) असल्यास बेक्टेल या कंपनीला दिलेली करमाफी ची रक्कम वसूल करणे आवश्यक असतानाही शासनाकडून रक्कत वसूल न करण्याची कारणे काय आहेत
(५) नसल्या विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०५-०९-२०१५)** :(१) होय.
(२) कैंद्रिय विक्रीकर अधिनियम, १९५६ तसेच कार्यकंत्राट कर अधिनियम, १९८९ मध्ये कर माफ करण्याची तरतूद नसल्याने थकबाकी माफ करता येणार नाही, असे राज्याचे महाअधिवक्ता यांनी अभिमत दिले आहे.

(३) मे.बेक्टेल इंटरनॅशनल इन्कॉ., मुंबई व राज्य शासन यांच्यामध्ये झालेल्या बंधमुक्त करारातील तरतुदीनुसार कराची रक्कम समायोजनाने रद्दबातल केली आहे.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**दुधाच्या किंमतीबाबत खाजगी व सहकारी दुध व्यवसायिकांना एकत्र घेवून सर्व समावेशक धोरण तयार करणेबाबत**

**(४८) १९२४० (०६-०८-२०१५). श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.संजय (बाळा) भेगडे (मावळ), श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल) :** सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य शासनाने दुधाला २० रुपयांपेक्षा कमी दर देणा-या दुध संस्थांवर फौजदारी गुन्हे दाखल करण्याचा इशारा माहे मे २०१५ मध्ये दिला आहे, हे खरे आहे काय ?
(२) असल्यास, पुणे जिल्ह्यातील ४ ते ५ दुधसंस्था वगळता इतर सारेच दुध व्यवसायिक २० रु. प्रति लिटरपेक्षा कमी दर शेतकऱ्यांना मे २०१५ पासून देत आहेत हे खरे आहे काय?
(३) असल्यास, खाजगी व सहकारी दुध व्यवसायिकांना एकत्र घेवून सर्व समावेशक धोरण तयार करणेबाबत शासनाकडून अद्याप कुठलीही कार्यवाही झाली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, राज्यातील दुग्ध उत्पादक शेतक-यांना दुधाला प्रति लिटर २५ रुपये बाजारभाव देण्याबाबत शासनस्तरावरुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (२९-०८-२०१५) :**(१) होय.
(२) आंतरराष्ट्रीय बाजारातील दूध भुकटीच्या दरात मोठ्या प्रमाणावर घसरण झाल्यामुळे तसेच दूध भुकटीच्या आंतरराष्ट्रीय मागणीत घट झाल्याने खाजगी दूध भुकटी प्रकल्पधारकांनी व काही सहकारी संघांनी त्यांच्या दूध खरेदी दरात कपात केली हे खरे आहे.
(३) शासनामार्फत निश्चित केलेले दर हे खाजगी व सहकारी प्रकल्पांना बंधनकारक नाहीत. केंद्र शासनाने स्विकारलेल्या खुल्या आर्थिक धोरणामुळे दुग्धव्यवसाय खाजगी क्षेत्राकरीता खुला झाला आहे. आंतरराष्ट्रीय बाजारातील दूध भुकटीच्या दरातील चढ-उतारानुसार राज्यातील खाजगी/सहकारी दूध प्रकल्प त्यांचे दूध खरेदी व विक्रीचे दर त्यांचे स्तरावरुन ठरवित असतात.
असे असले तरी, शासनाने निश्चित केलेले दूध खरेदीचे दर (वरकड खर्चासह) हा प्रमाणक दर समजून राज्यातील सहकारी दूध संस्था/ दूध संघांनी दूध उत्पादक शेतकऱ्यांना हाच दूध खरेदी दर वेळोवेळी निर्गमित होणाऱ्या शासन निर्णयाच्या दिनांकापासून देणे आवश्यक आहे, असे निदेश महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० च्या कलम ७९ अ अन्वये दि.१०.७.२०१५ रोजी निर्गमित केले आहेत.
(४) दि.१६ डिसेंबर,२०१४ रोजी नागपूर विधीमंडळ अधिवेशन काळात मा.मुख्यमंत्री व मा.विधानसभा अध्यक्ष यांच्या समवेत संबंधित लोकप्रतिनिधींच्या समवेत संबंधित लोकप्रतिनिधींच्या बैठकीत झालेल्या निर्णयानुसार सहकारी संघांकडे अतिरिक्त स्वरुपात

संकलित होणारे दूध तोटा सहन करुन शासन शासकीय दूध खरेदी दराने स्विकारीत आहे. शासनाचे दूध खरेदी दर रु.२०/- अधिक रु. २.५० वरकड खर्च असे मिळून रु. २२.५० प्रतिलिटर असे आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अमरावती (जि.अमरावती) येथे ४०० के.व्ही. क्षमतेच्या नवीन केंद्राची निर्मिती करणेबाबत**

**(४९) २०४३७ (१०-०८-२०१५). श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अमरावती जिल्हयाकरिता नियमित मुबलक विद्युत पुरवठा होण्यासाठी अमरावती येथे ४०० के.व्ही. क्षमतेच्या नवीन केंद्राची निर्मिती करणेबाबत लोकप्रतीनिधी अचलपूर यांनी दिनांक २८ मे, २०१५ रोजी शासनास पत्र देवून मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे,काय
(३) असल्यास चौकशीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०५-०९-२०१५) :**(१) होय, याबाबत मा.लोकप्रतिनिधींचे दि.०४.०४.२०१५ चे पत्र प्राप्त झाले आहे.
(२) होय.
(३) नांदगावपेठ, जि.अमरावती येथे ४०० के.व्ही. उपकेंद्र उभारण्याच्या प्रस्तावास राज्य पारेषण उपक्रमाच्या पंचवार्षिक योजनेत समावेश करण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अहमदनगर जिल्हयातील राहुरी तालुक्यातील मुळा प्रवरा इलेक्ट्रीक को.ऑ.सोसायटी लि. श्रीरामपुर वीज संस्थेच्या कर्मचा-यांच्या प्रलंबित प्रश्नाबाबत**

**(५०) २२३८९ (०६-०८-२०१५). श्री.शिवाजीराव कर्डिले (राहुरी) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अहमदनगर जिल्हयातील राहुरी तालुक्यातील मुळा प्रवरा इलेक्ट्रीक को.ऑ.सोसायटी लि. श्रीरामपुर वीज संस्थेच्या कर्मचा-यांच्या प्रलंबित प्रश्नाबाबत तात्काळ बैठक लावणेबाबतचे निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधी (राहुरी) यांनी मा.मुख्यमंत्री यांना दिनांक ६ मार्च, २०१५ रोजी दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त निवेदनावर शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) असल्यास, कार्यवाहीचे स्वरुप काय आहे,
(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

वि.स. ८८ (36)

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०५-०९-२०१५) :**(१) हे खरे आहे.
(२) मा.मंत्री (ऊर्जा) यांच्या अध्यक्षतेखाली मुळा-प्रवरा इलेक्ट्रीक को-ऑप.सो.लि. या संस्थेच्या प्रलंबित प्रश्नाबाबत दि.२३.०३.२०१५ रोजी बैठक घेण्यात आली.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.